# लता मंगेशकर -भाग १



मराठी रंगभूमीवरील थोर गायक आणि अभिनेता दीनानाथ मंगेशकर यांचे एप्रिल १९४२ मध्ये निधन झाले. आपल्या पश्चात लता, मीना, आशा, उषा आणि हृदयनाथ ही आपली पाच मुले आपल्याला अभिमान वाटेल आणि अमाप कीर्ती मिळेल अशी उत्तुंग कामगिरी करतील याची तीळमात्रही कल्पना त्यांना निधनसमयी आली नसेल. आपली मुलगी लता ही इतकी प्रसिध्द होईल आणि लाखो, करोडो गानप्रिय रसिकांच्या हृदयात विराजमान होईल असेही त्यांना वाटले नसेल. आपली ही कन्या गायनासाठी इतके असंख्य पुरस्कार मिळवील की ते ठेवायला आपले अख्खे घर अपुरे पडेल ही कल्पनाही त्यांच्या मनात आली नसेल.

एवढेच नाही, तर ह्या सुपुत्रीबद्दल समाजातून आलेले फक्त सकारत्मक प्रशंसोद्गार जरी चौकटीत घालून टांगून ठेवायचे ठरवले तरी एखादा भव्य दिवाणखाना भरून देखील ते उरतील. त्यांपैकी काही उद्गार खालीलप्रमाणे आहेत :

आसमान-ए-मौसिकीका सबसे बुलंदतर सितारा (गानक्षेत्रातील अत्युच्च तारा) - दिलीपकुमार

लताचा आवाज ही देवाने तिला दिलेली देणगी आहे आणि ज्या प्रकारे तिने या आवाजाचा वापर केला ती लताने देवाला दिलेली देणगी आहे. - पुनिता भट्ट (लताची मैत्रीण आणि तिच्या स्टेज शोज ची व्यवस्थापिका)

कम्बख्त कभी बेसुरी नही होती. क्या अल्लाह की देन है ! - बडे गुलाम अली खाँ

लता ही गान सरस्वती आहे. - हृषिकेश मुखर्जी

दीदींचे गाणे ऐकताना देवाचे अस्तित्व जाणवते. - उस्ताद झाकिर हुसेन

तिचा आवाज म्हणजे दैवी देणगी आहे आणि त्याचा तिने कल्पकतेने उपयोग करून तणावग्रस्त समाजाला सुखशांती दिली. - व्हायोलिन वादक लालगुडी जयराम

५०० चांगले राजकारणी करणार नाहीत इतकी चांगली कामगिरी ह्या गानकोकिळेने देशासाठी केली. - सुनील दत्त

आमचे अस्तित्व तिच्यावरच अवलंबून आहे. ती आहे तरच आम्ही आहोत. - माधुरी दीक्षीत
तिच्यापुढे टिकाव धरणे नूरजहानला कठीण झाले असते. नूरजहानचा धोका लताला नसून परिस्थिती त्या उलट होती. - तलत मेहमूद
राष्ट्रीय एकात्मतेचे ते एक अप्रतिम उदाहरण आहे. - शिक्षणतज्ज्ञ सी. डी. देशमुख

राजू भारतन आणि हरीश भिमानी या दोघा इंग्रजी चरित्रकारांच्या पुस्तकांतून तसेच आणखी बऱ्याच लिखाणांतून या गायिकेबद्दलचे अशाच प्रकारचे असंख्य प्रशंसोद्गार आपल्याला सापडतील. लताच्या चरित्रांतून तिच्या लहानपणापासूनची माहिती आपल्याला मिळते.

लताचा जन्म इंदोर येथे २८ सप्टेंबर, १९२९ रोजी झाला. तिची आई शेवंती ही गुजराती होती, तर वडील दीनानाथ हे महाराष्ट्रीयन होते. मीना, आशा, उषा ह्या तिच्या बहिणी आणि भाऊ हृदयनाथ ही तिची धाकटी भावंडे होत.

ती जेव्हा पाळण्यात होती तेव्हाच तिच्या वडिलांच्या लक्षात आले की हिला गाण्याची उपजत जाण आहे आणि त्यांनी म्हटलेली सगळी गाणी ती लक्षात ठेवून चालीवर गुणगुण्याचा प्रयत्न करी.

वयाच्या पाचव्या वर्षी तिला खूप देवी आल्या आणि तिच्या चेहऱ्यावर कायमस्वरूपी व्रण ठेवून गेल्या.

ती शाळेत फक्त एक दिवसच गेली. दुसऱ्या दिवशी ती वर्गातील मुलांना गाणी म्हणून दाखवताना पकडली गेली. शिक्षक तिला रागे भरले. दीनानाथ मंगेशकरांच्या मुलीचा कोणी अपमान करूच शकत नाही असा त्रागा तिने केला. अशी शाळा तिला अजिबात आवडली नाही आणि तिने शाळेला सोडचिठ्ठी दिली. पुढे तिला येणारा तात्काळ राग पाहता ही त्याची एक चुणूक होती असे म्हणायला हरकत नाही. तिच्या या संतापी आणि कुणालाही माफ न करण्याच्या स्वभावाबद्दल वृत्तपत्रांनी भरपूर लिहून ठेवलं आहे आणि अगदी तिची मैत्रीण म्हणवून घेणाऱ्या पुनीता भट हिनेही फिल्मफेअरच्या जून १ ते १५, १९८७ च्या कव्हर स्टोरीमध्ये हे मान्य केलं.

'सुभद्रा' नाटकातील नारदाची भूमिका करणारा नट अचानक आजारी पडल्यावर वयाच्या केवळ सातव्या वर्षी तिने त्या नाटकात नारदाची भूमिका केली. तिचे वडील अर्जुनाची भूमिका करीत होते. नारदाची दोन्ही पदे आणि संवादही आपल्याला चांगले पाठ असल्यामुळे आपल्याला नारदाची भूमिका करू द्यावी म्हणून तिने वडिलांची मनधरणी केली. तसे केले नसते तर नाटकाचा प्रयोग रद्द करावा लागला असता त्यामुळे तिला परवानगी देण्याखेरीज त्यांच्याकडे गत्यंतरच नव्हते. तिने ती भूमिक उत्कृष्टपणे निभावली आणि तिच्या वडिलांना खूप आनंद झाला.

याच दरम्यान ती घरात चालणारे गाणे बजावणे अत्यंत आनंदाने ऐकत असे. विशेष करून तिची आजी म्हणजे आईची आई गहू दळताना, गरबा खेळताना वगैरे गाणी म्हणे ती लताला खूप आवडत. आजीच्या बरोबरीने ती गाणी म्हणत असे. त्यामुळे तिने जेव्हा नूरजहाँ आणि सैगल यांची गाणी ऐकली तेव्हा ती ऐकून जशीच्या तशी म्हणने तिला कठीण गेले नाही.

निर्माता दिलसुख पांचोली यांनी त्यांच्या गाजलेल्या 'खजांची' या संगीतमय चित्रपटाचे अभूतपूर्व यश साजरे करण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांचा शोध घेण्यासाठी संपूर्ण देशात 'खजांची गायन स्पर्धा' आयोजित केली होती. लता तेव्हा फक्त बारा वर्षांची होती. लताला पहिले बक्षीस मिळाल्याने ती खूपच आनंदित झाली. ह्या बक्षीसासोबत तिला एक दिलरुबा बक्षीस मिळाला. (दिलरुबा म्हणजे त्या वेळचे अतिशय लोकप्रिय असे कमानदार गज असलेले वाद्य होय.) त्या वेळी तिचे वडील मुंबई बाहेर होते. परंतु तिचे सुदैव म्हणजे 'खजांची'चे प्रथितयश संगीतकार गुलाम हैदर यांनी तिचे गाणे ऐकले आणि या मुलीकडे गायनाची दैवी देणगी आणि भविष्यकाळात यशस्वी होण्याची पात्रता आहे हे हेरून ठेवले.

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com